

रयत शिक्षण संस्थेचे,

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, वाशी

## सेंट्रल लायब्ररी

## वाचन प्रेरणा दिन

भारताचे माजी राष्ट्रपती दिवंगत डॉ. अब्दुल कलाम यांना त्यांच्या बालवयापासूनच वाचनाची आवड होती. हीआवड त्यांना विद्वत्तेच्या शिखरावर घेऊन गेली. त्यांच्या स्वप्नातील भारत घडविणारी आजची तरुण पिढी वाचनापासून दुरावत चालली आहे हे आजच्या समाजाचे चित्र आहे. ज्या – ज्या वेळी तरुणांशी संवाद साधण्याची संधी त्यांनी मिळाली त्या–त्या वेळी वाचनाचे महत्व त्यांनी युवकांपर्यंत पोहचविण्याचा आटोकाट प्रयत्न केला. वाचनाविषयी सांगताना डॉ. कलाम म्हणतात *पुस्तकांच्या सहवासात ज्ञानाबरोबर नेहमीच मला आनंदही मिळाला आहे. ग्रंथ ही माझी सर्वात मौल्यवान ठेव आहे. युवक वाचतील तर देश वाचेल अशी त्यांची खात्री होती. अभ्यासापुरतेच वाचन मर्यादित न राहता अवांतर वाचनही महत्वाचे आहे कारण अवांतर वाचनाने अनेक संदर्भ तर मिळतातच परंतु आकलनशक्ती वाढते व व्यक्तिगत विकास होतो.* वाचनाचे महत्व सर्वांपर्यंत पोहचविण्यासाठी अपार प्रयत्न करणाऱ्या डॉ. कलाम यांचा जन्मदिवस वाचन प्रेरणा दिन म्हणून संपूर्ण देशात साजरा केला जातो.

सध्या कोविड–१९ च्या महामारीच्या काळात सर्वांच्या सुरक्षिततेचे पालन करण्यासाठी कोणामार्फतही या आजाराचा प्रसार होवू नये यासाठी शासनाने सांगितलेल्या सर्व नियमांचे पालन करुन आपल्या महाविद्यालयात अनोख्या पद्धतीने वाचन प्रेरणा दिन साजरा करणार आहोत. श्रवण, भाषण, वाचन, लेखन हे शिक्षण प्रक्रियेतील अविभाज्य घटक आहेत त्यापैकी श्रवण आणि भाषण आपण नेहमीच करत असतो. आपल्याला वाचनात देखिल तेवढ्याच गतीने पुढे जाण्यासाठी

## एक पान प्रतिभेचं...



या उपक्रमाचे आयोजन केले आहे. या उपक्रमात सहभागी होण्यासाठी तुम्हास आवडलेल्या प्रतिभासंपन्न लेखकाच्या कोणत्याही पुस्तकातील एका पानाचे प्रकट वाचन करुन त्या वाचनाचा व्हिडिओ तयार करुन खालील लिंकच्या माध्यमातून आमचेकडे दि. १४ ऑक्टोबर २०२० पर्यंत पाठवायचा आहे.

***तर मग कसलाही वेळ न घालविता वाचन संस्कृती वृध्दींगत करणाऱ्या या उपक्रमात सहभागी होवू चला ! ही खऱ्या अर्थाने डॉ. कलाम यांना आदरांजली असेल.***

### * व्हिडिओ पाठविणेसंबंधी सूचना

* व्हिडिओच्या सुरुवातीला आपले पूर्ण नाव, महाविद्यालयाचे नाव, पुस्तकाचे नाव, लेखकाचे नाव, प्रकाशकाचे नाव आवर्जून सांगावे. ते पुस्तक, त्यातील पान तुम्हास का आवडले हे थोडक्यात सांगावे.
* दि. १४ ऑक्टोबर पर्यंत आलेले व्हिडिओ छाननी करुन निवड कमिटी मार्फत स्विकारले जातील. नंतर आलेल्या व्हिडिओजचा विचार केला जाणार नाही.
* कविता, नाटक वगळून इतर साहित्य प्रकार, लेखनाचे अभिवाचन आपण करु शकता.
* व्हिडिओ तयार करताना आवाजातील चढ–उतार, भावपूर्णता, सुस्पष्ट उच्चार, सादरीकरण, शैली याला महत्व आहे.
* व्हिडिओचा आकार हा १० एम.बी. पेक्षा जास्त नसावा.
* खालील लिंकच्या माध्यमातूनच व्हिडिओ स्विकारले जातील.
* एका व्यक्तीने एकच व्हिडिओ पाठविणेचा आहे.

एक पान प्रतिभेचं...

उपक्रमात सहभागी होण्यासाठी क्लिक करा

**सौ. मानसी रसाळ**
ग्रंथपाल

**डॉ. शुभदा नायक**
प्र. प्राचार्य